**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.०९.०६.२०२२

# अवैधरीत्या विनापरवाना लोखंडी सळया व भंगार साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर विशेष पथकामार्फत कारवाई, ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त.

***

जिल्ह्यात अवैधरीत्या वस्तूंची साठेबाजी व विनापरवाना विक्री करणाऱ्यांविरोधात एकंदरीत अवैध धंद्यांविरोधात विशेष पथकामार्फत कारवाईची मालिका सुरु आहे. याच मालिकेचा एक भाग म्हणून दि.०८.०६.२०२२ रोजी पोलीस स्टेशन धनज बु. हद्दीतील दोनद फाट्यावरील हांडे पॉइंट धाबा येथे अवैधरीत्या लोखंडी सळया विक्री सुरु असल्याची माहिती मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह(IPS) यांना मिळाल्याने त्यांच्या आदेशाने विशेष पथकामार्फत कारवाई करण्यात आली आहे.

मौजे धनज येथील दोनद फाट्यावरील हांडे पॉइंट धाबा येथे अवैधरीत्या लोखंडी सळया विक्री सुरु असल्याची गोपनीय माहिती मा.पोलीस अधीक्षक साहेब यांना प्राप्त झाल्याने त्यांनी सपोनि.भारत लसंते यांना सदर ठिकाणी धाड टाकून कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात आदेशित केले. मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली सपोनि.भारत लसंते यांच्या विशेष पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली असता त्यांना दोनद फाट्यावरील हांडे पॉइंट धाबा येथे ६, ८, १०, १२, १६, २० व ३२ एम.एम. आकाराचे टाटा स्टील, सेल, जिंदाल, टी.एम.टी., ईगल व लोकल भंगार अशा कंपनीचे ठिकठिकाणी लोखंडी सळ्यांचे ढीग व लोखंडी भंगार (अँगल) आढळून आले. त्याठिकाणी विक्रीकरिता लागणारा परवाना, ई-वे चलान व शॉप अ‍ॅक्ट परवाना नसतांनाही शामू रामचंद्र शर्मा, वय ३५ वर्षे, धंदा – मजुरी, रा.गोरखपूर, उत्तर प्रदेश ह.मु.दोनद बु. हा सदर मालाची अवैधरीत्या विक्री करतांना आढळून आला. सदर माल हा नागपूर येथील बदरे आलम अब्दुल सय्यद याचे मालकीचा असून तो बनावट शॉप अ‍ॅक्ट लायसन्स वापरून सदर ठिकाणी अवैधरीत्या लोखंडी सळया साथीदारांसह विक्री करत असल्याने त्यावर कारवाई करण्यात आली. सदर ठिकाण हे शेतमालक गजानन हांडे यांच्या स्वतःच्या मालकीचे असून त्यांनी शेत सर्वे क्र.१६५ मध्ये आरोपीस बनावटीकरण करून अवैधरीत्या लोखंडी सळया विक्री करण्यास भाडेतत्वावर देऊन सहकार्य केले. सदर ठिकाणी अंदाजे ६० टन लोखंडी माल अंदाजे किंमत ३५ लाख रुपये अवैधरीत्या साठवून विनापरवाना विक्री करत असल्याचे आढळून आल्याने आरोपींविरुद्ध ४६३, ३४ भादंवि नुसार कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सपोनि.भारत लसंते, पोहेकॉ./१०७४, विजय तायडे, पोकॉ./१२, अमोल कांबळे, पोकॉ./१२६६, राजकुमार यादव, पोकॉ./३८३, दिपक मुळे यांनी पार पाडली.

**( जनसंपर्क अधिकारी )**
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.